**नि.फौ.ख.क्रं. ९९/२०१५** **निशाणी क्र. २०**
**शासन .वि. सचिन साहू व इतर**

## अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रं.०२ ची शपथेवर जबानी

.......

**माझे नांव** – राजेश पुंडलीकराव आदमने
**वय** – ४७ वर्षे, धंदा – नोकरी,
**राहणार** – तालुका व जि. नागपूर.

.......

**सरतपासणी – अभियोगपक्षातर्फे सरकारी अभियोक्ता व्ही.एम.गजभिये मॅडम यांच्यामार्फत**

१. सन २०१५ मध्ये जी.टी.एल. मोबाईल टॉवरची बॅटरी चोरी गेली होती. त्यावेळी मी जी.टी.एल. कंपनीमध्ये कार्यरत होतो. आता ही मी जी.टी.एल. कंपनीमध्ये कार्यरत आहोत. कांढळी येथे सदरचे टॉवर आहे. आमच्या पुणे येथील कार्यालयामधुन सदरचे टॉवरचे पावर सप्लाई बंद झाला आहे याबाबत आमच्या टेक्नीशीयन संतोष चव्हाण व मला फोन आला होता. त्यामुळे आम्ही कांढळी येथील सदरच्या टॉवर वर गेलो, तेथे गेल्यावर आम्हाला त्या टॉवरचा २४ बॅट–या चोरी गेल्याचे आढळुन आल्या. त्यामुळे आमच्या कंपनीमधील समिर कट्टमवार यांनी पोलीस स्टेशनला जाउन फिर्याद दिली. मी व संतोष त्यांच्या सोबत गेलो होतो. संतोषला आम्ही फोनकरुन बोलविलो होतो. दोन दिवसांनी पोलीसांनी आम्हाला फोनकरुन सिंदी रेल्वे येथील पोलीस स्टेशनला बोलविले होते. त्यांनी आम्हाला बॅट–या व चोर सापडल्याचे सांगितले. त्यांनी आम्हाला सदरच्या बॅट–या व तीन आरोपी दाखविले. घटनेला अकरा वर्षे झाल्यामुळे मी आरोपींना नेमके ओळखु शकत नाही. पोलीसांनी माझे बयान नोंदविले होते.

**सरतपास संपला**

**उलटतपास आरोपींतर्फे विधीज्ञ आर.एस.लिल्हारे यांच्या मार्फत :**

२. हे म्हणणे खरे आहे की, फिर्याद देण्याकरिता केवळ समिर कट्टमवार गेले होते. हे म्हणणे खरे आहे की, प्रत्यक्ष घटना मी पाहिलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी मला आरोपींचे नाव सांगुन ओळख करुन दिली नव्हती. मी पोलीसांना कंपनीमध्ये कार्यरत असल्याचे कागदपत्र दिले नाही. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीच्या सांगण्यावरुन मी

पोलीसांनी बयान दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासात सांगितल्याप्रमाणे कोणतीही घटना घडली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.**

**फेरतपास काही नाही.**

**श्रवणोत्तर स्विकृत**

SHAILESH RAJENDRA SATBHAI
Digitally signed by SHAILESH RAJENDRA SATBHAI
Date: 2026.03.09 17:40:13 +0530

(एस. आर. सातभाई)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, सेलू,
जिल्हा–वर्धा.

**दिनांक** : ०९/०३/२०२६